अवतीभवती

गिरगाव : बहिर्जी विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले.

बहिर्जी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

गिरगाव : वसमत तालुक्यातील गिरगाव येथे बहिर्जी विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करून वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. गिरगाव येथे सकाळी नऊ वाजता वाचनालयातील सर्व पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. मुख्याध्यापक सुरेश वगेवार यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मिसाईल मॅन डॉ. कलाम यांची प्रेरणा घेऊन त्यांचे गुण घेत त्यांची पुस्तके वाचून आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहन केले. यावेळी पर्यवेक्षक चंद्रकांत राऊत, शिक्षक एस.पी. घुगे, श्रीनिवास मस्के, शंकर राऊत, ओमकार बारसे यांच्यासह शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

सेवा संकल्प अभियानांतर्गत पत्रकारांचा सन्मान

वसमत : जनहिताच्या प्रश्नांना लेखणीतून वाचा फोडत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या वसमत येथील पत्रकारांचा 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत गौरव करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार सत्यविजय अनवेकर, विजय दगडू ,पंकज नांदापुरकर, मोईन कादरी यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार व सन्मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. 'सेवेची २५ वर्षे – सेवा, सुशासन, गरीब कल्याण आणि राष्ट्रनिर्माण' या संकल्पनेतून आयोजित अभियानाच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत वसमत येथील पत्रकारांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सन्मानित पत्रकारांना प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि सेवा संकल्प अभियानाचे संयोजक चंद्रकांत पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आतिश दांडेगावकर मित्र मंडळाच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात आला.

हिंगोली : संगीतमय सुंदरकांड सोहळ्यास उपस्थित भाविक.

नगर परिषद कॉलनी परिसर भक्तिरसाने न्हाहला

हिंगोली : शहरातील नगर परिषद कॉलनी परिसरात जगदंबा नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवांतर्गत गुरूवारी (ता. १५ ऑक्टोबर) तुलसी मानस मंडळाच्या वतीने आयोजित संगीतमय सुंदरकांड सोहळ्याने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. नवरात्रोत्सवानिमित्त परिसरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ज्येष्ठ विधिज्ञ नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली संचलित, ४५ वर्षांची परंपरा लाभलेल्या तुलसी मानस मंडळाने सुंदरकांडाचे संगीतमय पठण व सादरीकरण केले. मधुर स्वरांत सादर झालेल्या सुंदरकांड पठणासह वादनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. यावेळी दुर्गामातेच्या विविध भक्तिगीतांचे गायन करण्यात आले. भक्तीमय वातावरण, सुरेल भजने आणि सुंदरकांडाच्या स्वरांनी संपूर्ण परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. या सोहळ्यास नगरसेवक सुमित कांबळे, रत्नाकर बांगर यांच्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगीतमय सुंदरकांडाच्या माध्यमातून भाविकांनी भक्तीचा आनंद अनुभवला. दरम्यान, उत्सव काळात जगदंबा नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक, धार्मिक उपक्रम राबविण्यात येत असून भाविकांनी मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

ग्रंथालय अधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन

हिंगोली : शहरातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूरकर, माजी प्राचार्य सी. के. देशपांडे, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ व जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, जी. पी. मुपकलवार, जिल्हा माहिती कार्यालयाच्या अलका पाटील, ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. कलाम यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला.

हिंगोली : शिरड शहापूर येथील महिलांच्या वतीने प्रशासनास निवेदन सादर करून मागण्या मांडण्यात आल्या.

महिला बचत गटांचे कर्ज माफ करून नवे कर्ज द्या

शिरड शहापूर, ता.१६ (बातमीदार) : राज्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाने बँकांच्या सक्तीच्या कर्ज वसुलीला स्थगिती, शाळांच्या शुल्कात, वीज बिलात सवलत आणि रोजगार हमीची कामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्ज वसुलीचा प्रश्न 'जैसे थे' असून बचतगटातील महिला मेटाकुटीला आल्या आहेत. त्यामुळे हे कर्ज माफ करून नवे कर्ज द्यावे, अशी मागणी वगरवाडी येथील महिलांच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील हजारो महिलांनी महिला बचतगटाच्या माध्यमातून मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्ज घेतले आहे. यामध्ये या कर्जाची परतफेड साप्ताहिक व मासिक हप्त्याने करावी लागते. दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न घटले, हाताला काम नाही, त्यामुळे हप्ता भरणे महिलांना अशक्य झाले आहे. ठरलेल्या दिवशी एजंट घरी येऊन हप्त्यासाठी तगादा लावतात. उत्पन्नाचे साधनच नसताना हप्ते फेडायचे कसे? असा प्रश्न महिलांसमोर उभा आहे. त्यामुळे महिलांवर आर्थिक व मानसिक दबाव वाढत आहे. शासनाने बँक वसुलीला स्थगिती दिली. मग मायक्रो फायनान्सला का नाही? असा सवाल महिला विचारत आहेत. त्यामुळे अशा फायनान्सचे अल्प कर्ज माफ करून पुनश्च नवीन कर्ज देऊन या महिलांना स्वावलंबी बनवून पुन्हा उभे राहण्यासाठी मदत करावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. हे निवेदन देताना शिवसेनेचे राम नागरे यांच्या नेतृत्वाखाली वगरवाडी येथील महिला उपस्थित होत्या.

रुग्णसेवेत हयगय आता चालणार नाही

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांकडून यंत्रणेचा आढावा

हिंगोली, ता. १६ : जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्वॉस) प्राप्त करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, उपकरणे/ साहित्याची उपलब्धता, औषध साठा याबाबतची मागणी व उपलब्धतता खात्रीशीर नोंदवावी. आरोग्य सेवांचा दर्जा आणि रुग्णाभिमुख कार्यपद्धती यामध्ये सुधारणा करून सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. या कामात हलगर्जीपणा किंवा दिरंगाई केल्यास तत्काळ कारवाई करू, असा इशारा जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांनी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात शुक्रवारी (ता.१६) जिल्हाधिकारी गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र पुरी, बालरोग तज्ज्ञ डॉ. गोपाल कदम, डॉ. विशाल पवार, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, डॉ. प्रशांत पुठावार यांच्यासह विभागप्रमुखांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याबरोबरच, संबंधित आरोग्य संस्थांनी आवश्यक साहित्याची मागणी विहित नमुन्यात अचूकपणे नोंदवावी. अनावश्यक साहित्याची मागणी करू नये. आवश्यक पायाभूत सुविधा आणि साहित्य उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असून, आवश्यक साहित्य दोन दिवसांत पुरविण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी सांगितले.

'नो रेफर'साठी प्रयत्न करा

आरोग्य उपकेंद्रांमध्ये आलेल्या रुग्णांना विनाकारण अन्यत्र पाठवू नये, तर उपलब्ध सुविधांनुसार प्राथमिक उपचार करावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. आरोग्य संस्थांमधील सेवा अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक व रुग्णकेंद्री करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने आणि परस्पर समन्वयाने काम करावे. रुग्णांना वेळेत दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. आरोग्यसेवेबाबत नागरिकांच्या कुठल्याही तक्रारी येता कामा नयेत. त्यासाठी वरिष्ठ यंत्रणा आवश्यक सहकार्य करेलच, परंतु अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही आपली जबाबदारी चोख पार पाडावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

या आढावा बैठकीत जिल्हा आरोग्य यंत्रणेने एकत्रितपणे काम करत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनात यश मिळविण्याचा निर्धार केला.

...तर मिळेल दिलासा

■ सध्या दुष्काळी स्थिती असून सामान्यांपुढे आर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा स्थितीत ग्रामीण आरोग्य यंत्रणेने दर्जेदार पद्धतीने सेवा दिल्यास नागरिकांचा खासगी ठिकाणी होणारा खर्च वाचू शकेल अन्यथा प्रशासनाच्या सोपस्काराला काहीही अर्थ राहणार नाही.

हिंगोली : जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांच्या उपस्थितीत आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. याप्रसंगी उपस्थित अधिकारी वर्ग.

आरोग्य केंद्रांना देणार अचानक भेटी

■ राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेने निर्धारित निकषांनुसार १०० टक्के मूल्यांकनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. आरोग्य संस्थांमधील कामांचा दर्जा तपासण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः अचानक भेटी देऊन पाहणी करणार आहेत. यासह अनेकदा ग्रामीण आरोग्य यंत्रणेच्या कार्यस्थळी अधिकारी-कर्मचारी हजर नसल्याच्या तक्रारी येतात. त्याचीही शहानिशा करून कारवाई करण्यात येणार आहे. पुढील महिन्यात सर्व तालुक्यांतील आरोग्य उपकेंद्रांचीही तपासणी करण्यात येणार आहे.

या निकषांवर भर

■ सेवा उपलब्धता: आवश्यक आरोग्यसेवा मिळतात का?
■ रुग्णांचे अधिकार: रुग्णांची गोपनीयता, सन्मान आणि संमती जपली जाते का?
■ सुविधा व साधनसामग्री: डॉक्टर, कर्मचारी, औषधे आणि उपकरणे उपलब्ध आहेत का?
■ वैद्यकीय उपचारांची गुणवत्ता: तपासणी, निदान आणि उपचार योग्य पद्धतीने होतात का?
■ संसर्ग नियंत्रण: संसर्ग रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जाते का?
■ गुणवत्ता व्यवस्थापन: नोंदी, तपासणी आणि सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न होतात का?

दसरा महोत्सव समिती गायन स्पर्धेत शांता लगड प्रथम

हिंगोली, ता. १६ : सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या पुढाकाराने शहरात १४ ऑक्टोबर रोजी घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत शांता लगड यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत एकूण ४० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध स्पर्धा घेण्यात येत आहेत. या अंतर्गत घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेच्या परिक्षक काशिनाथ नागठाणे यांनी निकाल जाहीर केला. यामध्ये द्वितीय क्रमांक कलक तिवारी व त्रिवेणी दत्ता वाघे यांना विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांक नवनाथ लोहगांवकर यांना तर युवराज जाधव, गोपिका नानवाटे, सरस्वती इंगळे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. १८ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता एनटीसी भागातील छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरातील आई जगदंबा मातेच्या प्रागंणात बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी सेवानिवृत्त तहसीलदार मधुकर खंडागळे व आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी पुढाकार घेतला. दरम्यान, या गायन स्पर्धेला शहर आणि परिसरातील रसिक श्रोत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कळमनुरी : येथील वीरशैव दुर्गा महोत्सव समितीच्या वतीने नवदुर्गेची रूपं आणि माहिती असलेला देखावा सादर केला आहे.

प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत गोटेवाडी शाळेचे यश

आठ क्रीडा प्रकारांत विविध वयोगटांत यश मिळवित विद्यार्थ्यांनी मारली बाजी

कळमनुरी, ता. १६ (बातमीदार) : एकात्मिक आदिवासी विकास विभागांतर्गत आयोजित प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा १३ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत शासकीय आश्रमशाळा गोटेवाडी येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत गोटेवाडी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी हॉलीबॉल, हँडबॉल, कबड्डी, खो-खो, रिले, भालाफेक, थाळीफेक व धावण्याच्या स्पर्धेत यश मिळवून स्पर्धेत आपला दबदबा निर्माण केला.

आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत शासकीय व अनुदानित अशा एकूण १४ शाळांच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. यामध्ये १४ व १७ वर्षाच्या वयोगटात हॉलीबॉल स्पर्धेत गोटेवाडी आश्रम शाळेच्या मुले व मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. हँडबॉल क्रीडा स्पर्धा ही १४ व १७ वयोगटात गोटेवाडी आश्रम शाळेच्या मुले व मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. कबड्डीमध्ये १४ वर्षे वयोगटात मुलींच्या संघाने अजिंक्य पद मिळवले तर खो-खो १७ वर्षे वयोगटात मुलीच्या संघाने विजेतेपद मिळवले. खो-खो स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. याशिवाय रिले भालाफेक थालीफेक व विविध अंतराच्या धावण्याच्या स्पर्धांमध्येही यश मिळविले. स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रकल्प अधिकारी डॉ. सुनील बारसे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. भडके, श्री. भोसले, क्रीडा अधिकारी गणेश बोडके यांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक व्ही.के. धोंडगे, एस.एस. देशमुख, टी.के. सोमुसे, एस.एस. सपकाळ व इतर शिक्षकांची आदींची उपस्थिती होती. यावेळी क्रीडा शिक्षक नवीद पठाण यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कळमनुरी : प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविणारे गोटेवाडी आश्रम शाळेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसह शिक्षकवृंद.

हिंगोली शहरात रविवारी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

हिंगोली : सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने १८ ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे शिवाजीराव देशमुख सभागृहात बुद्धिबळ स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा सकाळी १० वाजता होईल. स्पर्धेमध्ये तीन गट ठेवण्यात आले असून, स्पर्धा नॉक आऊट पद्धतीने होईल. खेळाडूंनी आपली नावे शनिवारी संध्याकाळपर्यंत हरपालसिंग शेट्टी, शरद वाघमारे, सोपान कुटे, सुरज बेले, दिनकर हंबर्डे, राजू पित्ती, नेपालसिंह ठाकूर, रजनीश पुरोहित यांच्याकडे नोंदवावीत, असे आवाहन हिंगोली जिल्हा चेस असोसिएशनने केले आहे.

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

सर्कल ऑफिस नाशिक, वुडलँड टॉवर अपार्टमेंट, दुसरा मजला, गंगापुर रोड, नाशिक - 422 005

शुध्दिपत्रक

मागणी सूचना

सर्व जनतेस आणि कर्जदार / जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, दिनांक 16/10/2026 रोजी दै. सकाळ, हिंगोली आवृत्तीमध्ये मागणी सूचना जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. **सदर जाहिरातीमध्ये श्रीमती नंदा चंद्रशेखर गोपनारायण पत्ता: नाकाशी, पोस्ट देगाव तालुका : बाळापूर जिल्हा : अकोला पिन -444001 हे नाव सदर नोटीसमध्ये जामीनदार म्हणून अनावधानाने / चुकीने समाविष्ट करण्यात आले आहे.**

सदर नोटीसमध्ये जामीनदार म्हणून अनावधानाने / चुकीने समाविष्ट करण्यात आलेले नाव या शुध्दीपत्रकाव्दारे जामीनदार यादीतून वगळण्यात / रदद करण्यात येत आहे. त्यांना या कर्ज खात्याचे जामीनदार धरण्यात येऊ नये करीता हे शुध्दीपत्रक.

स्वाक्षरी/-
डी. श्रीनिवास
अधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक

दिनांक - १७.१०.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

पंजाब नॅशनल बँक भारत सरकारचा उपक्रम | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०९.२०२६रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००) कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ प्रोप्रायटर **श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५	१. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व** - सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम** - सावली रोड, **दक्षिण** - शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर** - रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व** - श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता,**पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण** - श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317**	**अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु.३३,७२,१२५.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा**	१. अ) रु. १९.३३ लाख ब) रु. १.९३३ लाख (०३.११.२०२६) क) रु. ०.१० लाख १. अ) रु. १०.४८ लाख ब) रु. १.०४८ लाख (०३.११.२०२६) क) रु. ०.१० लाख	**दि. ०३.११.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत**	**माहित नाही**

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **03.11.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

स्वाक्षरी/-
श्री. संतोष सिंग
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

दिनांक - १७.१०.२०२६ | स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य